www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 171 वा शुक्रवार दि. 07 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता
प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त स्पर्धेत'विक्रमसिंह राठोड''यांना पॅरा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पुणे येथे झालेल्या 02 मार्च 2025 रोजी तिसऱ्या राज्यस्तरीय पॅरा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये ७२ किलो वजन गटात १५७.५० किलो वजन उचलून विक्रमसिंह राठोड (नेरूळ गाव नवी मुंबई)यांनी सुवर्णपदक जिंकले*. *शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त असलेले विक्रमसिंह राठोड यांची१६-१८ मार्च २०२५ रोजी नोएडा, उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये आणि २०-२७ मार्च २०२५ रोजी नवी दिल्ली येथील ज.ल.ने स्टेडियमवर होणाऱ्या खेलो इंडिया पॅरा गेम्स२०२५ च्या दुसऱ्या आवृत्तीत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व* *करण्यासाठी विक्रमसिंह राठोड यांची निवड झाली आहे. नेरूळ नवी मुंबईचे रहिवासी असलेले विक्रमसिंह राठोड यांना मित्र आणि गुरुवर्य श्री. राकेश पाटील, यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले आहे. वल्कन हेल्थ क्लब, नेरूळ,नवी मुंबई येथे नियमित सराव करणाऱ्या या जिद्दी खेळाडूला वल्कन हेल्थ क्लबचे (नेरूळ गाव नवी मुंबई) क्रीडाप्रेमी मालक व संचालक दयानंद भगत आणि सर्व खेळाडूं सहकारी यांनी नेहमीच पाठिंबा आणि प्रोत्साहन दिलेआहे. याबद्दल विक्रम सिंह राठोड यांनी सर्वांचे खुप खुप आभार मानले असून पुढील राष्ट्रीय स्पर्धात पदक मिळवण्याचा निश्चय केला आहे.*विक्रमसिंग राठोड यांनी पॅरा ऑलम्पिक गेम्स सिडनी ऑस्ट्रेलिया येथे सन2000 मध्ये भारतीय देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच विक्रमसिंग अधिकारी यांना सन 2002-03 चा नवी मुंबई भूषण पुरस्कार आणि 2002--2003 चा महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मिळाला आहे. आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू दोन्ही पायांनी अधू (अस्थिव्यंग--१००%) असून आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये ते कांस्यपदकाचे मानकरी झालेले आहेत.




# एमबीए प्रवेश सीईटीसाठी दीड लाखाहून अधिक अर्ज

## गतवर्षीच्या तुलनेत यंदा नोंदणीमध्ये वाढ; १ ते ३ एप्रिलदरम्यान परीक्षा

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई** : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ‘एमबीए’ व ‘एमसीए’ या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी राबवण्यात आलेली नोंदणी प्रक्रिया नुकतीच समाप्त झाली. या अभ्यासक्रमासाठी गतवर्षीच्या तुलनेत यंदा विद्यार्थ्यांनी अधिक अर्ज केल्याचे निदर्शनास आले आहे. एमबीए प्रवेशासाठी १ लाख ५७ हजार २८१ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. एमबीएसाठी १ ते ३ एप्रिल दरम्यान परीक्षा होणार आहे. तर एमसीए अभ्यासक्रमासाठी ५६ हजार २५७ अर्ज आले असून, २३ मार्च रोजी परीक्षा होणार आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशपूर्व परीक्षांसाठी अर्ज करण्याच्या तारखा अंतिम टप्प्यात आहेत. काही अभ्यासक्रमांची नोंदणी करण्याची मुदत संपली तर काही अभ्यासक्रमांची येत्या काही दिवसांत संपणार आहे. एमबीए आणि एमसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज नोंदणी करण्याची मुदत नुकतीच संपली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा एमबीए व एमसीए या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले.

**‘एमसीए’ला चांगला प्रतिसाद**

यंदा एमबीए अभ्यासक्रमासाठी १ लाख ५७ हजार २८१ विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केली आहे. तर गतवर्षी एमबीएच्या ५० हजार ५०१ जागांसाठी १ लाख ५२ हजार ९११ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. एमबीएच्या तुलनेत एमसीएला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. एमसीए अभ्यासक्रमासाठी गतवर्षी ३९ हजार ९६५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी ३८ हजार ४७९ इतक्या जणांनी अर्ज शुल्क भरून निश्चित केले होते. यंदा एमसीए अभ्यासक्रमासाठी तब्बल ५६ हजार २५७ विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केली आहे.




# बाजारातील मिरचीचा तडका उतरला .

## यावर्षी बाजार भाव अर्ध्यावर.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

पाककलेमध्ये" मसाले "म्हणजे कोणतीही बियाणे, फळे, मूळे, साल किंवा इतर वनस्पती जे प्रामुख्याने अन्नाला चव देण्यासाठी किंवा रंगविण्यासाठी वापरले जातात. मसाले हे औषधी वनस्पती पासून तयार केले जातात,चव देण्यासाठी किंवा सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या वनस्पतींची पाने, फुले किंवा देठ असतात. खाद्यपदार्थ तिखट, सुवासिक व स्वादिष्ट बनवण्यासाठी विविध वनस्पतींचे भाग वापरण्यात येतात त्याला मसाले म्हणतात. असे हे मसाले चोखंदळ गृहिणी आपल्या नेहमीच्या स्वयंपाकासाठी वापरला जाणारा महत्वाचा घटक म्हणजे मसाला आणि तो वर्षभर पुरेल असा बनवला जातो. मसाला बनविण्यासाठी मिरची हा हा महत्त्वाचा घटक आहे. साधारण मार्च एप्रिल या महिन्यापासून गृहिणी मसाला बनविण्यासाठी मिरचीची खरेदी करते. त्यामुळे आता मिरचीचा हंगाम सुरू झाला आहे. बाजार समितीत मिरचीची अवक मोठ्या प्रमाणात होत आहे .यावर्षी दक्षिणेकडील राज्यांमध्ये मिरचीचे उत्पादन प्रचंड झाल्यामुळे बाजारभाव निम्म्यावर आले आहेत. त्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे गृहिणींचा वर्षभरासाठीचा घरगुती मसाला करण्याची लगबग सुरू झाली आहे.बाजार समितीमध्ये मिरची व खड्या मसाल्यांना मागणी वाढली आहे. मसाले बाजारात मंगळवारी १३७ टन मिरचीची आवक झाली आहे. गेल्यावर्षीचे दर पहाता ते प्रचंड वाढल्यामुळे घरगुती मसाले बनवण्यासाठी गृहिणींनी हात आखडता घेतला होता. गेल्या वर्षी मिरचीचे सरासरी दर २२० ते४०० रुपये किलो होते. त्यामानाने यावर्षी हेच दर १४० ते २८० रुपयावर आले आहेत. आंध्र प्रदेश व कर्नाटका मधून सर्वात जास्त मिरचीची आवक होत आहे. दोन्ही राज्यात पीक भरपूर आल्यामुळे यावर्षी मिरचीचे दर घसरले आहेत. त्यामुळे अनेक गृहिणींच्या खिशाला परवडण्यासारखे आहे.भाव वाढले की गृहिणीचे आर्थिक बजेट कोलमडते. आणि मग घरगुती मसाले तयार करणे शक्य होत नाही त्यामुळे तयार मिरची पावडरला त्या पसंती देतात गेल्यावर्षी या पावडरचे दर देखील २००ते ५२० रुपये किलो होते. यावर्षी हेच दर १६० ते २४० रुपये आहेत. असा हा मिरचीचा हंगाम एप्रिल अखेरपर्यंत सुरू राहील आंध्र प्रदेश व कर्नाटकांमधून आवक होत आहे, गतवर्षीपेक्षा बाजार भाव कमी असल्यामुळे ग्राहक ही खुश आहेत.असे बोलले जात आहे.






# मोरा बंदरातील गाळात रुतलेली लॉन्च सेवा पूर्ववत सुरू होणार.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

उरण ची जलजीवन वाहिनी बनलेली मोरा ते भाऊचा धक्का लॉन्स सेवा या सागरी मार्गातील समुद्राच्या भरती ओहोटीमुळे या मार्गावरील मोरा बंदरालगत सातत्याने गाळ जमा होतो त्यामुळे लॉन्च वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. ओहोटीच्या वेळेस लॉन्च सेवा दररोज तीन ते चार तास बंद ठेवावी लागते याचा त्रास प्रवाशांना होत आहे. मोरा बंदरातून भाऊचा धक्का येथून मुंबईत पोहोचण्यासाठी अवघा एक तास लागतो. याशिवाय प्रदूषण, वाहतूक कोंडी या त्रासापासून दूर ठेवणारी तसेच कमी खर्चात आणि अत्यंत जवळचा प्रवास असणारी हि स्वस्त लॉन्च सेवा मोरा ते भाऊचा धक्का अशी या सेवेची ओळख आहे. दररोज कामासाठी मुंबईला जाणाऱ्या हजारो चाकरमान्यांची त्यामुळे गैरसोय होत आहे. **पान २ वर**



"मोरा बंदरात नेमक्या कोणत्या बाबी गाळाची समस्या निर्माण होण्यास कारणीभूत आहेत? यासाठी अभ्यास गट तयार केला आहे त्यानंतर मोरा बंदरातील गाळाची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी उपाय योजना करण्यात येणार आहे"
( प्रकाश चव्हाण कार्यकारी अभियंता मेरीटाईम बोर्ड)

# गोलमाल है भाई सब गोलमाल है सिधे रस्तेकी ये तेढी चाल है |

## आडमार्गाला सिलेंडर बद्दलण्यामागे गोलमाल ?

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

भारत पेट्रोलियमचे घरगुती गॅस सिलेंडर हे द्रोणागिरीनोडमध्ये रस्त्याच्या आडमार्गाला सिलेंडर अदलाबदल करीत होते. याबाबत कर्मचारी बोलण्यास तयार नाहीत. यावरून यामध्ये काहीतरी गौडबंगाल असल्याचा संशय व्यक्त केला जातो. याची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. घरगुती गॅस सिलेंडरमध्ये हेराफेरी करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामध्ये भरलेल्या गॅस सिलेंडर मधील गॅस रिकाम्या सिलेंडरमध्ये भरून त्याची विक्री करण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत तक्रारी वाढल्याने शासनाने घरगुती गॅस सिलेंडर देताना वजन करून देणे सक्तीचे असतानाही उरणमधील गॅस सिलेंडर विक्रेते वजन न करता घरपोच सिलेंडर दिले जात आहेत. भारत पेट्रोलियम गॅस सिलेंडरच्या बाबत अशा तक्रारी जास्त आहेत. या कंपनीचे कर्मचारी ग्राहकांशी उर्मट वर्तन करीत असल्याने नाराजीचा



सूर निघत आहे. यापूर्वी ही करंजा परिसरात असलेल्या गोडाऊनमध्ये हेराफेरी केल्याच्या तक्रारी होत्या. परंतु आज मंगळवार दि. 4मार्च 2025 रोजी दुपारी 1ते2 च्या दरम्यान द्रोणागिरी नोडमधील वर्दळ कमी असलेल्या ठिकाणी एका मोठ्या ट्रकमधून शकुंतला गॅस सर्व्हीसच्या छोट्या गाड्यांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरची अदलाबदल केली जात होती. यावेळी कोणीही पहाण्यास नसल्याने काही भरलेल्या सिलेंडर मधून गॅस कमी करून रिकाम्या सिलेंडरमध्ये भरला जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याबाबत चौकशी केली असता कर्मचारी बोलत नव्हते. यामागे गौडबंगाल नसता तर घरगुती गॅस सिलेंडर हे आड मार्गाला खाली करण्या ऐवजी मुख्य रस्त्यावर करू शकले असते. यामुळे गॅस सिलेंडर विक्रेत्यांकडून काहीतरी हेराफेरी नक्कीच केली जात असल्याने ते आडमार्गाला घरगुती गॅस सिलेंडर अदलाबदल केले जात असल्याचे बोलले जाते. तरी घरगुती गॅस सिलेंडर घरपोच डिलिव्हरी घेताना ग्राहकांनी वजन करून घ्यावेत. आसपासचे शेजारीही आडमार्गालाच घरगुती सिलेंडरची अदलाबदल केली जात आहे, याला दुजोरा देत आहेत. याबाबत अधिकारी वर्गाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु तो होऊ शकला नाही. याची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



## राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अंतर्गत "रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियम" या विषयावर

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जी.एम.मुजावर यांचा परिसंवाद.**

**दै. युवक आधार**
**प्रतिनिधी राम ढाकणे**
**१९० उरण रायगड.**



५४ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अंतर्गत "रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियम" या विषयावर दि.४ मार्च २०२५ रोजी कॉन्फरन्स हॉल, प्रशासकीय भवन, जेएनपीटी या ठिकाणी न्हावा शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जी.एम. मुजावर यांचे व्याख्यान तसेच परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सदर परिसंवादात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुजावर यांनी जेएनपीटी परिसरातील वाढत्या रहदारीच्या अनुषंगाने घ्यावयाची दक्षता तसेच नजीकच्या भविष्यकाळात करणे आवश्यक असलेली उपायोजना, याबाबत उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले, व योग्य त्या सूचना दिल्या. तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी सार्वजनिक रस्त्यावर प्रवास करताना , वाहन चालवताना घ्यावयाची दक्षता व वाहतुकीचे नियम याबाबत त्यांना मार्गदर्शन केले. सदर परिसंवादात जेएनपीटी प्रशासनाच्या वतीने मुख्य सुरक्षा व्यवस्थापक श्री तानाजी मोरे व इतर विविध विभागाचे सुमारे २५ ते ३० अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# शेतकऱ्यांच्या 'पिवळ्या सोन्या'ची शोकांतिका – विदर्भ आणि यवतमाळच्या शेतकऱ्यांसाठी गंभीर संकट

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

यवतमाळ, दि.6 मार्च. सोयाबीन हे विदर्भ आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे नगदी पीक आहे. गेल्या काही दशकांत हे पीक शेतकऱ्यांना आधार देणारे ठरले आहे.मात्र,सध्या सोयाबीन उत्पादकांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे.

**विदर्भ आणि यवतमाळ,**
**सोयाबीन उत्पादनाचे महत्त्वाचे केंद्र---** विदर्भ हा महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादनाचा मोठा भाग असून, यवतमाळ हा राज्यातील सर्वाधिक सोयाबीन उत्पादक जिल्ह्यांपैकी एक आहे.यवतमाळसह अकोला, अमरावती,वाशीम,बुलडाणा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची लागवड केली जाते. यवतमाळ जिल्ह्यातील सोयाबीन लागवड क्षेत्रः सुमारे ४.५ ते ५ लाख हेक्टर विदर्भातील एकूण सोयाबीन लागवड क्षेत्रः सुमारे २२ ते २५ लाख हेक्टर
उत्पादनः विदर्भात वार्षिक सरासरी २५ ते ३० लाख टन सोयाबीन उत्पादन होते. प्रति एकर उत्पादनः सरासरी ५ ते ६ क्विंटल सोयाबीनचे बाजारभाव आणि शेतकऱ्यांची अडचण---- सध्या सोयाबीनचे दर ३,८०० ते ४,२०० रुपये प्रति क्विंटल एवढे कमी आहेत,जे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत तोट्याचे आहेत.हमीभाव ४,८९२ रुपये असला तरीही,बहुतांश शेतकऱ्यांना तो दर मिळत नाही. यवतमाळ आणि विदर्भातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीमाल घरात साठवून ठेवला आहे,कारण त्यांना अपेक्षित दर मिळत नाहीत.व्यापारी लॉबी आणि मोठ्या कंपन्यांच्या दबावामुळे बाजारभाव कोसळत आहेत. सोयाबीनच्या भावावर परिणाम करणारी मुख्य कारणे----
परदेशी आयातः मोठ्या प्रमाणावर विदेशी सोयाबीन तेल आणि उत्पादने भारतात येतात,त्यामुळे स्थानिक बाजारभावावर दबाव येतो. व्यापारी लॉबीचा हस्तक्षेपः मोठ्या व्यापाऱ्यांनी सोयाबीन मोठ्या प्रमाणावर खरेदी करून बाजारात तुटवडा निर्माण केला आहे. खरेदी केंद्रांवरील अडचणीः यवतमाळ आणि विदर्भातील अनेक शासकीय खरेदी केंद्रांमध्ये बारदानाचा अभाव, साठवणुकीसाठी जागेचा अभाव आणि तांत्रिक अडचणी असल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही.

**शेतकऱ्यांसाठी आवश्यक उपाययोजना----**
उत्पादन खर्चाच्या आधारावर हमीभाव निश्चित करणे.
यवतमाळ आणि विदर्भातील सरकारी खरेदी केंद्रांची संख्या वाढवून, तत्काळ खरेदी सुरू करणे. परदेशी सोयाबीन आयातीवर निर्बंध घालून,स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादनाला प्राधान्य देणे. व्यापारी आणि मिल लॉबीच्या अतिरेकावर नियंत्रण ठेवून, खुले बाजार दर शेतकरी हिताचे राहतील याची खबरदारी घेणे. शेतकऱ्यांची अवस्था सुधारण्यासाठी सरकारने त्वरित पावले उचलावीत. यवतमाळ आणि विदर्भातील हजारो शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळावा यासाठी सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा. शेतकऱ्यांनी वाढत्या तोट्यामुळे सोयाबीनऐवजी इतर पिकांकडे वळण्याचा विचार सुरू केला आहे, ही विदर्भ आणि यवतमाळसाठी मोठी धोक्याची घंटा आहे. सरकारने जर त्वरित निर्णय घेतला नाही,तर विदर्भातील शेतकरी सोयाबीनच्या लागवडीपासून दूर जातील, आणि हे पीक शेतकऱ्यांसाठी 'पिवळे सोने' राहण्याऐवजी 'शेतकऱ्यांची शोकांतिका' बनेल.



प्रा. पंढरी दत्तराव पाठे
(ग्रामीण शेती अभ्यासक)

## स्व.संतोष देशमुख हत्याकांड निषेधार्थ सिल्लोड येथे कडकडीत बंद :-आरोपी विरुद्ध संतप्त भावना व्यक्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या अमानवीय, राक्षसी, क्रूर, असह्य अशा पद्धतीने झालेल्या हत्या वेळीचे मारेकऱ्यांच्या कुरतेची छायाचित्रे समोर येताच सिल्लोड शहर व ग्रामीण भागातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, सकल मराठा समाज सिल्लोड तालुका वतीने गुरुवारी ( दि.६ मार्च) सिल्लोड कडकडीत बंदची हाक देण्यात आली होती. या हाकेला व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सिल्लोड शहरासह ग्रामीण भागात कडकडीत बंद पाळण्यात आला.
सिल्लोड शहरात सकल मराठा समाजाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात स्वर्गीय संतोष देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून या प्रकरणाचा जाहीर असा निषेध करण्यात आला. आरोपींना फाशीची शिक्षा मिळावी अशी संतप्त मागणी यावेळी करण्यात आली. अत्यावश्यक सेवा वगळता मुख्य मार्गासह संपूर्ण बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या .ग्रामीण भागातपण व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली. प्रत्येक मोठा असो की छोटा विक्रेता या सर्वांनी बंदमध्ये उस्फूर्त सहभाग घेऊन आपली दुकाने कडकडीत बंद ठेवून जोरदार घोषणाबाजी करत या घटनेचा निषेध व्यक्त केला.
यावेळी सकल मराठा समाज बांधवांसह सर्व जाती-धर्मीय बांधवांची उपस्थिती होती.



## प्रेस संपादक पत्रकार सेवा संघ लातूर जिल्हा शाखेच्या वतीने गरजूना फळांचे वाटप संघटना पत्रकारांची असून सामाजिक कार्य करते हे विशेष - अड. अंगद गायकवाड



दैनिक युवक आधार
लातूर वार्ताहर प्रेस संपादक पत्रकार सेवा संघ लातूर जिल्हा शाखेच्या वतीने मंदिरासमोर व रस्त्यावर बसणाऱ्या गरीब व्यक्तींना नुकतेच फळांचे वाटप करण्यात आले. केवळ सामाजिक भानेतून व लहूकुमार शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर शहरातील डॉ. अण्णाभाऊ साठे चौकातील सोन्या मारुती, राम मंदिर, हनुमान चौकातील हनुमान मंदिर या ठिकाणी बसलेल्या गरजू व्यक्तींना केळी, चिक्कू आदी फळांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी अड. अंगद गायकवाड म्हणाले की, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ ही संघटना पत्रकारांची तर आहेच पण सामान्य जनतेसाठी असे वेगवेगळे उपक्रम राबवत आहे म्हणून ही संघटना विशेष असल्याचे सांगितले. यावेळी साहित्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार प्राप्त नागनाथ कांबळे, जिल्हा अध्यक्ष लहूकुमार शिंदे, राष्ट्रप्रेमचे संपादक भुजंग कांबळे, धाराशिवचे ज्येष्ठ नागरिक भागवत भरगंडे, अड. अंगद गायकवाड, अड मधुकर कांबळे, साहित्य सम्राटचे संपादक पंडित हणमंते, पत्रकार सारिका चुंगे, प्रवीण हजारे, आकाश हळकुंडे, शेषेराव गवळी, अभिषेक माने, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे पदाधिकारी, पत्रकार, आदी मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र साहित्य संमेलनात पोपटी कविसंमेलनाची दखल घ्यावी लागेल. कविवर्य अरुण म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

कोकणात पोपटी हा प्रकार होत असून मागील २० वर्षे शेतमळ्यावर कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल शाखेच्या माध्यमातून "पोपटी कविसंमेलन" घेतले जात आहे.दरवर्षी मिळणारा कवींचा , ज्येष्ठ साहित्यिक,राजकारणी आणि रसिक प्रेक्षकांचा मिळणारा प्रतिसाद पाहता रात्रीच्या वेळी राज्यस्तरीय संमेलनास आलेल्या साहित्य रसिकांना " पोपटी कविसंमेलना"चा आनंद देण्यासाठी भविष्यात हा उपक्रम करावा लागेल.असे विचार सुप्रसिद्ध कविवर्य अरुण म्हात्रे यांनी पनवेल ( विचुंबे )या गावी पोपटी कविसंमेलनात काढले.पोपटीची कल्पना रुजविल्याबद्दल प्रा.एलबी.पाटील आणि सातत्याने आयोजन करणारे पत्रकार गणेश कोळी यांचे म्हात्रे यांनी अभिनंदन केले. दर्शना माळी यांच्या सुरेख सूत्रसंचालनात प्रवीण बोपुलकर, गझलकारा ज्योत्स्ना राजपूत, लोकसत्ताचे अशोक भांडारकर, गोपाळ शेळके, गुणवंत पाटील, अनिल भोईर, अक्षता गोसावी, किशोर पाटील, ज्ञानेश्वर म्हात्रे , शिवप्रसाद पंडित ,संजय होळकर अजय शिवकर,भरत पाटील, विजय गायकर, रिना कदम, अनुकूल माळी, विशाल पवार, संतोष जोहेकर,अरबाज खान, महेश सूर्यवंशी,माधवी मोतीलीन, एन.जी.पाटील,अनुज शिवकर, गज आनन म्हात्रे ,अमोल म्हात्रे आणि रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील , कविवर्य अरुण म्हात्रे यांच्या बहारदार कवितांनी वातावरण प्रसन्न केले. यावेळी एकूण ३७ कवींनी कविता सादर केल्या. सरपंच प्रमोद भिंगारकर,ग्रा.स. अनिल भोईर यांनी सुरेख व्यवस्थापन केले. विलास पुंडले, गणेश म्हात्रे,रामदास गायधने, स्मिता गांधी, गुरुनाथ म्हात्रे, इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.



## वीर वाजेकर महाविद्यालयाची समुद्र किनारा स्वच्छता मोहीम



**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालय महालण विभाग फुंडे तर्फे पिरवाडी समुद्र किनारा येथे स्वच्छता मोहीम दिनांक 3 मार्च रोजी प्रथम वर्ष विद्यार्थी व सर्व विभागामार्फत राबविली. प्र. प्राचार्य डॉ आमोद ठक्कर म्हणाले आज घन कचरा हा पर्यावरणाचा समतोल बिघडण्यास कारणीभूत ठरतोय. शहर व गाव स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येते परंतु समुद्र व त्याच्या किनाऱ्यावर साठलेला कचरा समुद्रातील जीव सृष्टी साठी मोठी समस्या बनली आहे, मच्छी व्यवसाया वर त्याचे विपरीत परिणाम होत आहेत. त्यासाठी समाजा मध्ये जागृती निर्माण व्हावी व समुद्र किनारा स्वच्छ व्हावा म्हणुन कांदळवन कक्ष अलिबाग,कांदळवन फाउंडेशन रेंज फॉरेस्ट ऑफीस व वीर वाजेकर महाविद्यालय ह्यांनी समुद्र किनारा स्वच्छता व कांदळवन जनजागृती मोहीम राबविण्याचा उपक्रम अंतर्गत आजच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. सदर मोहीम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य गजानन चव्हाण, डॉ संदिप घोडके प्रा राम गोसावी प्रा दिंधळे, डॉ झेलम झेंडे, प्रा. पवार, प्रा भुषण ठाकुर, प्रा प्रांजल भोईर, प्रा देवेंद कांबळे, प्रा मयुरी मोहिते डॉ राजकुमार कांबळे प्रा श्रीकांत गोतपागर, प्रा योगेश कुलकर्णी प्रा विशाल देशमुख ह्यांनी परिश्रम घेतले. 164 विद्यार्थ्यांनी ह्यावेळेस सक्रिय सहभाग नोंदवला. कांदळवन कक्ष अलिबाग चे साईश्वरी पडवळ व प्रथमेश नाचणकर उपस्थीत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कांदळवन जनजागृती जैव विविधता ह्या बाबत सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी समुद्र किनारी जैव सृष्टी प्रत्यक्षात पाहणी केली व स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## मोरा बंदरातील गाळात रुतलेली लॉन्च सेवा पूर्ववत सुरू होणार.

**पान १ वरून** दोन वर्षापूर्वी चार कोटी खर्च करून मोरा बंदरातील गाळ काढला पण तरीही गाळ भरायचे अजूनही थांबतच नाही. परंतु आता या समस्येतून बाहेर पडण्यासाठी मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता ही गाळात रुतलेली प्रवासी लॉन्च सेवा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. या गाळाच्या समस्येमुळे कधी कधी चार-पाच दिवस प्रवासी वाहतूक बंदच ठेवण्यात येत असल्याने प्रवाशांची गैरसोय होते तर कधी कधी नवख्या सारंग ड्रायव्हरमुळे लॉन्चेस गाळात रुतून बसतात, त्यामुळे प्रवाशांना हा त्रास सहन करावा लागत असे.अशी ही गाळाची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी प्रवासी, मुंबई जलवाहतूक संस्था, लॉन्च मालकांकडून सातत्याने मागणी होत होती, अखेर बंदर विभागाने या मागणीची दखल घेऊन तीन दिवसांपासून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात केल्याची माहिती मोराबंदर विभागाचे अधिकारी नितीन कोळी यांनी दिली.

# बाळगंगा धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करणार - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव- पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** पेण तालुक्यातील बाळगंगा धरण प्रकल्पाच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सकारात्मक बैठक झाली असून धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच या धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव- पाटील यांनी सभागृहात दिले. मुंबई येथे विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असून बाळगंगा धरणग्रस्तांचे प्रश्न आणि सदर प्रकल्प पूर्ण करण्यासंदर्भात पेण विधानसभा मतदार संघाचे आमदार रवीशेठ पाटील आणि पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष वेधले. सभागृहात बोलताना आमदार रवीशेठ पाटील यांनी बाळगंगा धरणासाठी १५ वर्षांपूर्वी जमीन संपादित केल्याचे नमूद करत त्या जमीन क्षेत्रातील सहा ग्रामपंचायती, नऊ महसुली गावे, १३ आदिवासी वाड्या आणि त्या अनुषंगाने तीन हजार कुटूंब विस्थापित होत आहेत. ग्रामस्थांचा धरणाला विरोध नाही परंतु त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लागले पाहिजेत. अगोदर पुनर्वसन मग धरण या कायद्याप्रमाणे शासनाने त्या ठिकाणी प्रकिया केली नाही. त्यामुळे धरणग्रस्ताला न्याय मिळाला पाहिजे यासाठी धरणग्रस्तांसाठी मोबदला, पुनर्वसन पॅकेज, नागरी सुविधा, कुटुंबसंख्या तफावत, इतर योजनांचा लाभ अशी विविध प्रश्न प्राधान्याने सोडवली पाहिजेत अशी मागणी केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले कि, धरणग्रस्तांना ४२६.२६ कोटी रुपयांचे वाटप झाल्याचे सांगण्यात येते मात्र काही कुटुंबाला अर्धवट रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे या विषयी आक्षेप निर्माण झाले आणि त्या अनुषंगाने आम्ही सदस्यांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत. धरणग्रस्तांना योग्य तो न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी अधोरेखित करतानाच संपूर्ण पुनर्वसनासाठी देण्यात येणाऱ्या मोबदल्याची पूर्ण प्रकिया आणि या धरणाचे काम किती कालावधीत होईल, अशी विचारणा सभागृहात केली. नामदार मकरंद जाधव-पाटील यांनी सभागृहात उत्तर देताना सांगितले कि, पेण, नवी मुंबई, पनवेल, उरण मधील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून सदर बाळगंगा धरणाला शासनाने २००९ साली मंजुरी दिली. परंतु न्यायालयीन बाबी, त्याचबरोबर कुटुंबसंख्या निश्चिती आणि काही आक्षेप असल्यामुळे या धरणाचे काम प्रलंबित राहिले. परंतु अलीकडेच या संदर्भात निर्णय पारित केला आहे. भूसंपादन अधिनियम १३ नुसार संपादन प्रक्रिया राबविण्यात आली आहे. जवळपास १३ गावे आणि १७ वाड्यांचे पुनर्वसन या संदर्भामध्ये होत आहे. बाळगंगा धरण प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ६८० कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे. यापैकी ४२६ कोटी रुपये वाटपास उपलब्ध झाले आणि ४. २४ कोटी रुपये न्यायालयात केसेस असल्यामुळे सदर रक्कम न्यायालयाकडे जमा करण्यात आली आहे. या संदर्भामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी महिन्यात बैठक झाली. या बैठकीमध्ये जे प्रश्न होते त्या संदर्भात काही निर्णय झाले. मुळामध्ये धरणाकरिता लागणारी रक्कम आहे ती देण्याचा निर्णयसुद्धा झाला. मुख्यमंत्री महोदयांनी हि जबाबदारी सिडकोला सोपवली आणि सिडकोनेही या विषयी मान्यता देऊन बोर्ड मिटिंग मध्ये या विषयाला मंजुरी दिली आहे. तसेच कुटुंबसंख्या निश्चितीची तक्रार होती ती फेरतपासणी करून २४७४ इतकी कुटुंबसंख्या निश्चित झाली आहे. आणि सदर प्रकल्पाच्या सुधारित पुनर्वसन आराखड्याला सरकारने ४ मार्च रोजी मान्यता दिली आहे. ८७७. २२ कोटी एवढ्या रक्कमेचा प्रस्ताव हा मान्यतेच्या संदर्भात विभागीय आयुक्तांना कळवण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्प आणि प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न दूर होऊन प्रकल्पाचे काम लवकरच मार्गी लागेल, असे त्यांनी सांगितले.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे त्या कंत्राटदाराला अभय का?

### पाटापांगरा मठ येथील सिमेंट कॉंक्रेट रोड प्रकरण

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी:वार्ताहर -** तालुक्यातील पाटापांगरा येथील तपोवन कडे जाणारा सिमेंट कॉंक्रेट रोड अर्धवट व निकृष्ट स्थितीत बांधला गेला असून या कामाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाचे असल्याची बाब समोर आली आहे. कामाचा कालावधी तीन महिन्याचा असताना सुद्धा मात्र सदर काम कमी कालावधीत निपटवण्यात आले, तालुक्यातील पाटपांगरा येथे संत महर्षी स्वामी सच्चिदानंद उर्फ चित्र ऋषी महाराज संस्थान असून श्री बालयोगी गुणवंत महाराज यांचा आश्रम आहे पाटापांगऱ्यापासून काही अंतरावर हे आश्रम आहे. मुख्य रस्त्यापासून आश्रमाकडे जाणाऱ्या सिमेंट कॉंक्रेट चा रोड अर्धवट व निकृष्ट स्थितीत कंत्राटदाराकडून करण्यात आले आहे, मात्र रस्ता मुख्य रस्त्यापासून न करता अलीकडे आणि पलीकडे अंदाजे 50 ते 60 फूट अंतर सोडून मधोमध काम करण्यात आले, सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे याबाबत चित्रऋषी महाराज ट्रस्ट मार्फत आक्षेप घेण्यात आले असुन अजून पर्यंत कोणती प्रकारची कारवाई सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेली नाही. अर्धवट काम केलेल्या रोडच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे बोर्ड लावण्यात आले आहे आणि त्या बोर्डावर स्पष्ट उल्लेख करण्यात आले आहे की, "मौजा पाटापांगरा येथे मुख्य रस्ता ते गुणाजी महाराज मंदिर पर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करणे." एवढं स्पष्ट शब्दात सदर बोर्डावर उल्लेख असताना सुद्धा काम अर्धवट व निकृष्ट करून सुद्धा अद्याप कारवाई का नाही व कुठे साठेलोटे तर नाही ना.? असा प्रश्न आता भाविक भक्तांकडून उपस्थित होत आहे.





## नोटीस

नमुना एन डी
**(नियम ९२(३) पहा)**
लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH /46/CC/AUTO/2019/2951मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BD5846 याचं तारीख 22/12/2024 रोजी निधन झाले आहे.

**मी श्रीमती**
**बेबीबाई बारकू पाटील**
चिखले ता - पनवेल,महाराष्ट्र रायगड- 410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.
याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**बेबीबाई बारकू पाटील**
**चिखले ता -पनवेल,महाराष्ट्र रायगड -410206.**

## नोटीस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)
लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH 2023-CC-4914Aमध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46BP 3934 याचं तारीख 18/09/2024रोजी निधन झाले आहे.

**मी श्रीमती**
नूतन विश्वनाथ वास्कर
कुंटेवहाळ रायगड.महाराष्ट्र 410206.

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.
याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.


**उत्तरआधिकारचे नाव-**
**नूतन विश्वनाथ वास्कर**
**कुंटेवहाळ रायगड,महाराष्ट्र -410206.**


**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# रंगपंचमीनिमित्त विविध रंगांनी पनवेल बाजारपेठ सजली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : होळीचा सण सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार यंदादेखील मोठ्या उत्साहात रंगपंचमी साजरी करण्यात येणार आहे. त्यासाठी आतापासूनच होळीच्या विविध रंगांनी पनवेलमधील बाजारपेठ सजली आहे. सध्या रंगपंचमीनिमित्त लहान मुलांसाठी पिचकारी खरेदीसाठी ग्राहकांची बाजारात लगबग दिसून येत आहे. रंगपंचमीच्या आठवडाभर आधीपासूनच लहान मुले पाण्याच्या पिशव्यांचा मारा करत आहेत. तर काही मुले पिचकाऱ्यांतून एकमेकांवर पाणीदेखील उडवत आनंद घेताना दिसत आहेत. पनवेल बाजारपेठेत विविध प्रकारचे नैसर्गिक रंग, लहानग्यांचे आकर्षण असणाऱ्या विविध प्रकारच्या पिचकाऱ्यांनी बाजारपेठ फुलली आहे. त्यामुळे खरेदीला ग्राहकांची व लहानग्यांची झुंबड उडत आहे. बाजारात रंगांचे व पिचकाऱ्यांचे दर 10 टक्क्यांनी वाढले आहेत. रंगपंचमीप्रेमींकडून नैसर्गिक रंगांना अधिक पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे. नैसर्गिक सुके रंग 80 ते 100 रुपये, तर ओले रंग 180 रुपयांवर उपलब्ध आहेत, 190 ते 500 रुपयांपर्यंत बाजारात विविध प्रकारच्या पिचकाऱ्या उलट असून यामध्ये विविध कार्टून पिचका-यांची क्रेज पाहायला मिळत आहे. यंदा पाठीवर लावणाऱ्या ड्रमच्या पिचकाऱ्या बाजारात भाव खाताना दिसत आहेत.



# "अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडियाचा महाराष्ट्रातील प्रा. संजय मोरे यांना ग्लोबल आयकॉन अवॉर्ड"

**प्रतिनिधी, किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रमुख**
कर्नाल, हरियाणा | 2 मार्च 2025 – अँटी करप्शन फाउंडेशन ऑफ इंडियाचा 7 वा स्थापना दिवस नूर महल हॉटेल, कर्नाल येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते आणि ग्लोबल आयकॉन अवॉर्ड्स प्रदान करण्यात आले.

संस्थापक नरेंद्र अरोरा, नॅशनल चेअरमन परवीन कुमार बन्सल, आंतरराष्ट्रीय संचालक राम नारायण साहू, महिला सेलच्या आंतरराष्ट्रीय अध्यक्ष डॉ. निशा गुप्ता, तसेच अनेक मान्यवर या सोहळ्यात सहभागी झाले. ग्लोबल आयकॉन अवॉर्ड्सचे वितरण कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्य अध्यक्ष आणि सर्व शक्ती सेना महाराष्ट्र अध्यक्ष तसेच भाजपा अनुजाती मोर्चा राज्य सचिव प्रा. संजय मधुकर मोरे यांना ग्लोबल आयकॉन अवॉर्ड्स सन्मान देण्यात आला. याशिवाय,कर्नाल येथील डॉ. रणजोध सिंह (भारताचे राष्ट्रीय अध्यक्ष ),राष्ट्रीय तायक्वांडू विजेते कु.प्रिशिता राजीव पनवार आणि रिजुल पनवार यांचा सुद्धा विशेष गौरव करण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती या भव्य सोहळ्याला सुप्रसिद्ध अभिनेते दलीप ताहिल, अभिनेत्री सुधा चंद्रन आणि अभिनेता राहुल रॉय हे सेलिब्रिटी पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

हा कार्यक्रम समाजातील भ्रष्टाचारविरोधी कार्यासाठी समर्पित व्यक्तींच्या सन्मानासाठी आयोजित करण्यात आला होता.



# जनतेच्या प्रश्नाची जाण असणारा जनसेवक- आ. विक्रांत पाटील

**लेख. अजय पांडुरंग कापरे**
**दैनिक युवक आधार -**
सध्या महाराष्ट्र राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन विविध कारणांनी गाजत आहे .काही अंशी मूळ प्रश्नांपासून हे अधिवेशन भरकटताना दिसत आहे . विधिमंडळातील सदस्य जनतेचे मूळ प्रश्न मांडत नाहीत पण यात काही आमदार असे आहेत .जे स्थितप्रज्ञ आहेत राज्यातील जनतेच्या मूलभूत प्रश्नांची जाणीव ते सरकारला करून देत आहेत .यातीलच एक नाव म्हणजे आमदार विक्रांत पाटील . युवा आमदार संपूर्ण महाराष्ट्र पायाला भिंगरी लावली की काय असे फिरत असतात .पक्ष संघटनाचे काम करता करता जिथे जातील तिथल्या स्थानिक नागरिकांचे युवकांचे मूलभूत प्रश्न जाणून घेतात .मागच्याच आठवड्यात त्यांनी सातत्य पूर्ण पाठपुरावा केलेला . राईट टू एज्युकेशन चा प्रश्न सरकारने सोडवला . आणि आज पुन्हा एकदा विधान परिषदेत पनवेल महापालिकेच्या हद्दीतील सर्वात मोठा प्रश्न पाणी संकट त्यांनी उपस्थित केला .विस्तृत पने प्रश्न मांडला . मोरबे धरणातून पाणी पुरवठा होईल का असे विचारले त्यावर जलसंधारण व पाणीपुरवठा मंत्री गिरीश महाजन यांनी उत्तर दिले .त्या नंतर ही विक्रांत पाटील यांनी ,बाळगंगा, पोशीर , शिलार प्रकल्पातून सध्या तरी पाणी पुरवठा केला जाऊ शकतो असे निदर्शनास आणून दिले . विविध मोठ्या प्रकल्पा मुळे या शहराची लोकसंख्या जवळ जवळ दोनशे पट वाढली आहे .आणि दिवसा गणिस ती वाढतच आहे .ही बाब त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली . महाराष्ट्रातील सर्वात जुनी नगरपरिषद आणि आत्ता ची पनवेल महानगरपालिका एके काळी तळ्याचे शहर म्हणून ओळख असणारे पनवेल गेले कित्येक दशक पाण्यासाठी पनवेलकरांच्या नशिबी 18 विश्व दारिद्र्य आहे . आत्तापर्यंतचे लोकप्रतिनिधी कधीच या प्रश्नाकडे हवे तेवढे लक्ष देत नव्हते . त्यामुळे पाणी माफीयांचा धंदा जोरात सुरू आहे . पण विधान परिषदेवर राज्यपाल कोठ्यातून आमदार झालेले विक्रांत पाटील हे सातत्याने पनवेलकरांचे प्रश्न विधिमंडळात मांडत आहेत . हिवाळी अधिवेशनामध्ये सुद्धा त्यांनी हा प्रश्न लावून धरला होता . आणि आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुद्धा त्यांनी सरकारचे याकडे लक्ष वेधले तळमळीने जनतेचे प्रश्न मांडणारा हा खरा जनसेवक आहे . अधिवेशन पुरते मर्यादित न राहता वेळोवेळी संबंधित विभागाच्या मंत्र्यांना पत्र देऊन ते सातत्यपूर्ण या प्रश्नाचा पाठपुरावा करत आहेत .युवकांच्या शिक्षणाचे ,नोकरी चे प्रश्न महिलांचे ,कामगारांचे प्रश्न ते सतत मांडत असतात .येणाऱ्या काळात पनवेल करांचा पाणी प्रश्न नक्कीच सुटेल अशी आशा विक्रांत पाटील यांच्या मुळे पनवेलकरांच्या मनात उपस्थित झाली आहे.



# महात्मा फुले महाविद्यालयामध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
पनवेल येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वा. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर समारंभास रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्ञानदेव म्हस्के, कुलगुरू, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा हे उपस्थित राहणार असून तसेच इतर मान्यवरांमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन माजी आमदार बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अरुण भगत, महेंद्र घरत, जे.एम.म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते केले जाणार असून त्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत. तरी सदर कार्यक्रमास सर्व नागरिकांनी,विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहून गुणी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावे व त्यांना भावी यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा द्याव्यात असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रमाचे कार्यवाह डॉ. राजाराम पाटील, सहकार्यवाह प्रा.जिनगोंडा बोरगावे व उपप्रचार्य डॉ. नामदेव पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# सुधागड कृषी मित्र संघटनेचे सदस्य पांडुरंग साजेकर सन्मानित ...

**दैनिक युवक आधार**
**सुधागड प्रतिनिधी**
रायगड मध्ये कृषी मित्र संघटना कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने भरारी घेताना दिसत आहे. नुकताच कृषी विज्ञान केंद्र रोहा येथे पी.एम किसान सन्मान निधी योजना वितरणाचा कार्यक्रम शेतकरी मेळाव्यानिमित्त आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यानिमित्त शेकडोच्या संख्येने शेतकरी बंधू भगिनी उपस्थित होत्या. सुधागड तालुका कृषी मित्र संघटनेचे अध्यक्ष शरद गोळे तसेच या कार्यक्रमाचे कृषी समन्वय रोहा श्री मनोज तलाठी यांनी शेतकरी बंधू भगिनींना शेती तसेच फळबागा बाबत माहिती दिली. कृषी मित्र संघटनेचे श्री पांडुरंग श्रीपत साजेकर सिद्धेश्वर बुद्रुक यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबाबत शेतकरी बंधू भगिनींच्या वतीने श्री मनोज तलाठी कृषी अधिकारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, त्रिफळ व पुष्पगुच्छ देऊन यांना सन्मानित करण्यात आले.





# थेपडे विद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षा 2024-25 बक्षीस वितरण समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**
**म्हसावद ता. जि.जळगाव**



आज दि. 6/3/2025 रोजी म्हसावद थेपडे विद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षा बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.डी.चौधरी यांनी भूषविले. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक जी.डी.बच्छाव,जेष्ठ शिक्षक एस.एम.पिंगळे,सौ.नेवे,एस.एम.नेतक,शिक्षक प्रतिनिधी चव्हाण,शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी वाघ,गांधी विचार संस्कार परीक्षा समन्वयक आर.आर.महाजन आणि एन व्ही पवार उपस्थित होते. गांधी विचार संस्कार परीक्षेत विद्यालयातील 685 विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग घेतला. यात जिल्हास्तरावर विद्यालयाची इयत्ता आठवी अ ची विद्यार्थिनी वेदिका गणेश आमले हिने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.तृतीय क्रमांकाचे चार विद्यार्थी मानकरी ठरलेत.त्यामध्ये अनुक्रमे सृष्टी पितांबर मराठे इयत्ता आठवी अ,कार्तिकी समाधान मराठे इयत्ता आठवी अ,विवेक आबा पाटील इयत्ता नववी अं आणि तन्मय जगदीश धनगर इयत्ता नववी अ या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले.विद्यालयाचे मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक आणि जेष्ठ शिक्षकांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना मेडल्स आणि प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी डी चौधरी यांनी गांधीजींच्या प्रतिमेला माल्यार्पण करून पूजन केले.आपल्या अध्यक्षीय भाषणातून पी डी चौधरी यांनी गांधीजींच्या जीवनातील विविध घटनांची माहिती सांगून विद्यार्थ्यांना गांधीजींच्या विचारांचे महत्व पटवून दिले.विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात सत्य,अहिंसा,प्रेम,करुणा,वासल्य या सदगुणांचा अवलंब करून आपले जीवन सर्वांग सुंदर करावे,असा मौलिक सल्ला दिला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एस.जे.पवार यांनी केले.कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी सहकार्य केले.

# ५४ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह जनजागृती कार्यक्रम

## तळोजा एमआयडीसी येथे टीएमए तर्फे वॉकाथॉनचे आयोजन


**दैनिक युवक आधार**
**तळोजा वार्ताहर**
राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह दरवर्षी प्रमाणे ४ मार्च ते ११ मार्च २०२५ दरम्यान साजरा केला जातो. या निमित्ताने तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (टीएमए) तर्फे डिश-रायगड आणि मार्ग ग्रुप फॉर इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने ५ मार्च २०२५, बुधवार रोजी सकाळी ९ वाजता तळोजा एमआयडीसी येथे वॉकाथॉन - सुरक्षा जनजागृती रॅलीचे सुंदर आयोजन करण्यात आले होते.




**यात जनजागृती**
टीएमए अध्यक्ष शेखर शृंगारे यांच्या वॉकाथॉनची थीम सुरक्षा आणि कल्याण हे विकसित भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. वॉकाथॉनची सुरुवात पंचमहाल जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेड (अमूल फॅक्टरी) एमआयडीसी वॉकाथॉन टीएमए इमारती जवळ समाप्त झाली. त्यानंतर समारोप सोहळा व बक्षीस वितरण कार्यक्रम टीएमए इमारतीत मोठ्या उत्साहात प्रेरणा देणारा ठरला. वॉकाथॉनदरम्यान वेगवेगळ्या स्पर्धांच्या आयोजनात घोषवाक्य ,सूचना दर्शक पोस्टर, स्लोग्न,निबंध अश्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सहभागी कर्मचारी सदस्य उद्योगांनी सुरक्षा विषयावर घोषवाक्ये व पोस्टर्स तयार करून वॉकाथॉनमध्ये सहभागी होताना ते दर्शवले . या स्पर्धेचे परीक्षण परीक्षकांद्वारे विजेत्यांना भेट वस्तू व प्रमाणपत्र देण्यात आले. अमूल, टेक्नोवा ,सारख्या अनेक कंपन्या कडून विशेष सहकार्य करण्यात आले. टीएमए सर्व सदस्य उद्योग, सुरक्षा अधिकारी,कर्मचारी व नागरिक पोलीस प्रशासन व एमआयडीसी अधिकारी कर्मचारी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कडक उन्हाळा, रमजानमुळे टरबूज खातेय भाव

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** पवित्र रमजान महिना सुरू झाला आहे. तसेच ऊनही चांगलेच तापायला लागले आहेत. यामुळे नागरिकांची पाऊले पाणीदार फळ खरेदीकडे वळायला लागले आहेत. यामुळे सिल्लोड बाजारपेठेत टरबुजाची आवक वाढली आहे. टरबुजाचे ठोक व्यापारी दरदोन दिवसाआड पैठण परिसरातून चार टन टरबूज फळाची गाडी भरून आणत आहेत. सध्या सिल्लोड शहरात दररोज पाच ते सहा टन टरबुजाची विक्री होत असल्याचे ठोक टरबूज व्यापाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, दर उन्हाळ्यात टरबुजाची विक्री केवळ दोन टनापर्यंतच होत होती. मागील काही वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण भागात टरबूज पिकाचे विक्रमी उत्पन्न घेतल्या जाते. त्यामुळे सिल्लोडची टरबुजाची संपूर्ण बाजारपेठ पैठण परिसरातील शेतकऱ्यांच्या टरबूजाने फुलून गेली आहे. या भागातील शेतकऱ्यांकडून टरबूज मोठ्या प्रमाणात सिल्लोड बाजारपेठेत आणली जात आहेत. ग्राहकांची सागर किंग व शुगर किंग या जातीच्या टरबुजांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. हे टरबूज फळ खाण्यास गोड व रवेदार असल्याने ग्राहकांच्या



पसंतीस उतरत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. आम्ही दरवर्षी गडचिरोली भागातील मोठे टरबूज विक्रीसाठी आणत होतो. परंतु आता आम्हाला त्याच दर्जाचे टरबूज पैठण भागातून उपलब्ध होत आहे. यामुळे वाहतुकीचा कमी खर्च पाहता परवडत असल्याने पैठण भागातील टरबूजाला व्यापाऱ्यांची पहिली पसंती आहे. सध्या १३ रुपये किलो ठोक टरबूज खरेदीचा भाव असून, आम्ही १५ ते २० रुपये किलो किरकोळ दराने विक्री करीत आहोत असे टरबूज व्यापारी शेख झहीर शेख मोहम्मद यांनी सांगितले.

**पोट साफ राहण्यासाठी टरबूज फायदेशीर**
टरबूजाच्या रसात फायबरचे प्रमाण अधिक असते. यामुळे पोट साफ राहण्यासाठी फायदेशीर ठरते. टरबूजाचा रस नियमित घेतल्याने गुड कोलेस्ट्रॉल वाढते. टरबूजाच्या रसात अमीनो ॲसीड्स आणि लाइकोपिन सारखे हृदयाला निरोगी ठेवणारे तत्व आढळतात. यामध्ये व्हिटॅमीन ए आढळते जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी चांगले असते.

**- डॉ.विनोद लोखंडे**
**सिद्धेश्वर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, सिल्लोड.**



# रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे धरणे आंदोलन...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**
**माणगांव** :-आज दि.६/३/२०२५ रोजी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने महाराष्ट्र राज्य सरकारचे प्रलंबीत मागण्यांकरिता लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग समोर दोन तास धरणे सत्याग्रह केले जाणार आहे. या आंदोलनात सरकारी-निमसरकारी, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. भानुदास बिरादार, उपाध्यक्ष प्रा.किशोर पाटील,प्रा. नितीन पाटील व सचिव प्रा. शामसुंदर किर्तने यांनी केले आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी



कार्यालयासमोर सकाळी १० ते १२ या वेळेत हे आंदोलन केले जाणार आहे. विविध हक्कांच्या मागण्यांसाठी राज्य सरकारकडून दुर्लक्ष होत आहे. चर्चासत्र, पत्र व्यवहार करुन देखील शासनाची प्रलंबीत मागण्यांसाठी उदासीनता दिसून येत आहे. या विरोधात तीव्र संघर्षाचे रणशिंग फुंकण्यापूर्वी धरणे सत्याग्रह आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधले जाणार असल्याचे म्हंटले आहे. महत्त्वाच्या प्रलंबित मागण्या खालील प्रमाणे आहेत (1)सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलबजावणी करण्याबाबतचे विस्तृत परिपत्रक तात्काळ जारी करण्यात यावे,(2) खुल्लर समितीचा अहवाल तात्काळ प्रसिद्ध करावा, (3) पीएफआरडीए कायदा रद्द करण्यात यावा, (4)फंड मॅनेजर कडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी. (5)ईपीएस 95 नुसार असणाऱ्या सर्व वर्गणीदारांना परिभाषित पेन्शन योजना लागू करण्यात यावी.(6)सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्या,(7) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण रद्द करून सरकारी विभागांचे संकुचिकरण तात्काळ थांबवावे (8)आठव्या वेतन आयोगाची सत्वर स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रह धरावा अन्यथा प्रत्येक पाच वर्षाच्या कालावधीनंतर वेतनमान पुनर्रचनेसाठी राज्याचा स्वतंत्र आयोग नेमावा, (9)सर्व सरकारी कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक, कंत्राटी, रोजंदारी कर्मचारी यांना सर्व हॉस्पिटल मध्ये कॅशलेस उपचार मिळावे यासाठी व्यापक स्वास्थ विमा योजना लागू करावी (10)जाचक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण रद्द करावे(11) संविधानातील कलम 310, 311 (2) ए बी आणि सी रद्द करावे (1) नवीन तीन क्रिमिनल कायदे रद्द करावे(13)संविधानात निर्देशित असणारी धर्मनिरपेक्षता अबाधित ठेवावी(14)1 नोव्हेंबर 2005 पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच 2005 नंतर शंभर टक्के अनुदानावर लागलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी(15) सरकारी कर्मचाऱ्यांवर कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हल्ल्याविरुद्ध कठोर कारवाई करावी(16)सर्व वर्गातील रिक्त पदे भरण्यात यावी(17) चतुर्थ श्रेणी कर्मचारी वाहन चालक भरतीवरील बंदी तात्काळ उठवावी(18) चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील 1981 चा शासन निर्णय निर्णयाची पुनर्स्थापना करण्याची मागण्यांसाठी धरणे सत्याग्रह केले जाणार आहेत.

# माणगांव तालुक्यातील उतेखोलवाडी येथील बेकायदेशीर भाडेकरूवर कारवाई करा - संदेश बादल

**दैनिक युवक आधार**
**माणगांव रायगड**
**माणगांव** :-माणगांव तालुक्यातील उतेखोलवाडी येथे अद्याप ही घर मालकांनी आपल्याकडे आलेल्या भाडोत्री जवळ कोणतेही चौकशी न करता आपल्या जवळ असणाऱ्या चाळीतील रूम तसेच प्लॅट धारकांचा आधार कार्ड, पॅन कार्ड न विचारता आपल्या फायद्यासाठी रूम प्लॅट भाड्यानी दिले जात आहेत. याच्यामुळे बाहेरून आलेल्या परप्रातीयांना अनेक वेळा याचा फायदा होत असतो. सद्या पाहायला गेलो असता माणगांवमध्ये चोरीचा प्रमाण वाढत चालला आहे.तसेच बाहेर चाललेल्या क्रिमिनल तसेच बलात्कार याचा प्रमाण वाढला आहे याचाच विचार करून आम्ही ज्या ज्या वेळी रूम भाडोत्री याच्या जवळ चोकशी करण्यासाठी गेलो असता त्यांनी आमच्या जवळ आरे तुरेची भाषा केली आम्ही काय बाहेरून आलो आहे का आम्ही काय बाहेर गावावरून आलो काय आम्ही इतलेच राहणारे आहोत मग तुमचा पासपोर्ट दाखवा आधार कार्ड रेशन कार्ड दाखवा मग पाहायला गेलो असता त्याचा सर्व पेपर बाहेरचे मग स्थानिक आम्ही इतले असे का बोलें जातात यावर आमची घर मालकानं विरुद्ध तक्रार करण्याची चौकशी करावी असे माणगांव पोलीस यांच्या जवळ विनंती करतो. आज पाहायला गेलो तर घर मालक कोणत्याही प्रकारची चौकशी न करता तसेच येणाऱ्या भाडोत्री जवळचे पेपर डॉकमेंट न पाहता रूम भाड्यानी का देतात तसेच त्याना तुम्ही जे का रूम वगैरे भाड्यानी देता त्यावेळी रूम करार एक वर्षाचा दोन वर्षाचा कि पाच वर्षाचा असं का बनविले जात नाही यामुळे समोरील व्यक्ती फॅमिली आहे मित्र परिवार आहे कि कोणी क्रिमीनल आहे याची पुरेपूर पाहणी न करता घर मालक रूम कसे देता यावरील विचार करता माणगांव पोलिसांनी सरळ घर मालकाची सखोल चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी अशी दैनिक युवक आधार माणगांव प्रतिनिधी संदेश बांदल यांनी मागणी केली






# 'श्रीगुरू पादुका दर्शन उत्सव' यंदा मुंबईत

## मा.ना. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन, ८ व ९ मार्चला वरळीत रंगणार सोहळा

**दैनिक युवक आधार - मुंबई, ६ मार्च २०२५:-** 'श्रीगुरू पादुका दर्शन उत्सव' हा एकाचवेळी २१ संत आणि सद्गुरूंच्या पादुकांचे दर्शन घडवणारा सोहळा यंदा ८ व ९ मार्च रोजी मुंबईत होणार आहे. वरळीतील 'नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया' च्या डोम मध्ये हा भक्तीचा महाकुंभ होणार आहे. भारताला संपन्न आध्यात्मिक परंपरा आणि सांस्कृतिक वैभव लाभले आहे. आपल्या संतांनी आणि सद्गुरूंनी या परंपरेचा जागर करत समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग दाखवला. सुदृढ, आरोग्यदायी आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीची वाट आपल्याला दाखवली. अध्यात्मिक मार्गावर चालण्याचा निर्धार करतानाच गुरूंप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'श्रीगुरू पादुका दर्शन उत्सव' सोहळ्याचे आयोजन केले आहे. प्रवेश सगळ्यांसाठी मोफत आहे मात्र नावनोंदणी आवश्यक करणे अनिवार्य आहे. अभिजित पवार, अध्यक्ष, एपी ग्लोबले यांनी सांगितले,''या कार्यक्रमातून भाविकांना एकाचवेळी पवित्र पादुकांचे दर्शन घेण्याचा अपूर्व योग उपलब्ध करून देण्यात आला आहे. हा कार्यक्रम प्रत्येकाला अमर्याद आध्यात्मिक शक्ती आणि एकत्रित भक्तीचे बळ देणारा आहे. सोबतच मा.ना. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रल्हाददादा पै उपस्थित राहणार आहेत. रविवारी ९ मार्च रोजी आध्यात्मिक मार्गदर्शक, वक्ते, लेखक, शिक्षणतज्ज्ञ व श्री एम सत्संग फाऊंडेशनचे प्रमुख पद्मभूषण श्री एम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे,''

या एकमेवाद्वितीय आणि पवित्र सोहळ्यात 'एपी ग्लोबले' तर्फे आध्यात्मिक प्रगती आणि सांस्कृतिक समृद्धी साठीच्या 'भक्ती-शक्ती व्यासपीठा' ची घोषणा होणार आहे. भाविकांना आध्यात्मिक आनंद आणि मनःशांती ची अनुभूती देणाऱ्या या अनोख्या सोहळ्याला गेल्या वर्षी उदंड प्रतिसाद लाभला होता. टाळ-मृदंगांचा गजर, अखंड हरिनामाचा जप, अभंगांचे सूर, दिंडी-रिंगणाने प्रसन्न झालेले वातावरण, यामुळे या भक्ती सोहळ्याने वेगळीच उंची गाठली होती. संत व श्रीगुरूंच्या पादुकांच्या दर्शनानंतर कृतार्थतेची आणि समाधानाची भावना प्रत्येक भाविकांच्या डोळ्यात दाटली होती. हाच अनुभव भाविकांना पुन्हा एकदा देण्यासाठी उत्सवाचे आयोजन केले आहे. उत्सवात भाविकांना संत आणि श्रीगुरूंच्या चरणांचे दर्शन घेण्याचा सुवर्णयोग प्राप्त होणार आहे. यासह उत्सवात आध्यात्मिक गुरूंचे मार्गदर्शन, भजन, कीर्तन, रिंगण सोहळा, नामस्मरण, ओंकार जप आदी कार्यक्रमही होणार आहेत.

संत व श्रीगुरूंच्या पादुकांचे दर्शन घेण्याची संधी- संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताई, संत नामदेव, संत जनाबाई, संत नरहरी सोनार, संत सेना महाराज, संत सावता माळी, संत एकनाथ, संत तुकाराम, संत निळोबाराय, श्री महेश्वरनाथ बाबाजी, श्री स्वामी समर्थ, श्री साईबाबा, श्री गजानन महाराज (शेगाव), समर्थ रामदास स्वामी, टेंब्ये स्वामी महाराज, गोंदवलेकर महाराज, शंकर महाराज, गुळवणी महाराज, गजानन महाराज (शिवपुरी), श्रीगुरु डॉ. बालाजी तांबे यांच्या पादुका भाविकांना दर्शनासाठी उपलब्ध असतील.

# आयआयटीच्या विद्यार्थ्यांच्या लक्झरी बसला आग

**कराड :** पुणे - बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरून निघालेल्या मुंबईतील आयआयटीच्या विद्यार्थ्यांच्या खासगी लक्झरी बसला अचानक भीषण आग लागल्याची घटना बुधवारी सकाळच्या सुमारास आनेवाडी टोलनाक्याजवळ घडली. दरम्यान, चालकाने प्रसंगावधान दाखवून ३२ मुला-मुलींना तातडीने बसमधून खाली उतरवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. मुंबईतील आयआयटीमध्ये शिक्षण घेणारी ३२ मुले आणि मुली खासगी लक्झरी बसने पुणे - बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरून साताऱ्याकडे जाण्यासाठी निघाले होती. सातारा तालुक्यातील चाळकेवाडी येथील सुझलॉन कंपनीतील प्रोजेक्टला भेट देण्यासाठी हे विद्यार्थी निघाले होती. याचवेळी या महामार्गावरील आनेवाडी टोल नाक्यापासून काही अंतर पुढे आल्यानंतर बसच्या पाठीमागील भागाला आग लागल्याचे चालकाच्या निदर्शनास आले. यावेळी तात्काळ प्रसंगावधान राखत बस चालकाने बससेवा रस्त्यावर वळवत थांबवली व तातडीने मुला-मुलींना बसमधून खाली उतरण्यास सांगितले.



# गोमांस वाहतूक; चौघांवर गुन्हा

**नवी मुंबई :** नवी मुंबईत प्रतिबंध गोवंश मांसाची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या चार आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी वाशी आणि नेरूळ येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नेरूळ येथील कारवाईत झाकीर निसार पठाण आणि नानु कुरेशी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. महाराष्ट्रामध्ये गोवंश हत्येस प्रतिबंध असतांना हे आरोपी गोमांस अवैधरित्या वाहतूक करून घेवून जात असताना त्यांना पोलिसांनी नेरूळ पोलिसांनी एलपी उड्डाणपुलाखाली पकडले. कुरेशी संगमनेर येथून भायखळा येथे हे मांस विक्रीसाठी घेवून जात होता. त्याच्या गाडीत सुमारे ८०० किलो मांस आढळून आले. अन्य एका गुन्ह्यामध्ये पोलिसांनी वाशी टोल नाका येथे सापळा रचून संशयितांच्या गाडीतून प्रतिबंध ४०० किलो गोमांस जप्त केले. तो हे मांस गोवंडी येथे विक्रीसाठी घेवून जात होते. वाशीतील घटनेत अझहर शहा आणि अब्दुल कुरेशी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### पदाधिकारी निवडीचा पेच असल्याने कामकाजावर परिणाम

# बाजार समितीच्या संचालक मंडळात सत्ताबदलाचे वारे

**लासलगाव :** नाशिक जिल्ह्यातील नाशिक, मनमाड, लासलगाव या तीन मोठ्या बाजार समित्यांमधील संचालक मंडळामध्ये वाद निर्माण झाल्याने नाशिक, मनमाड येथील बाजार समितीत सत्ताबदल होण्याची तर एक महिन्यापासून लासलगाव बाजार समितीत नवीन पदाधिकारी निवड पेच कायम असल्याने कामकाजावर परिणाम होत आहे.

लासलगाव बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती गणेश डोमाडे, यांनी ३ फेब्रुवारी रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला. ४ फेब्रुवारीला नाशिक जिल्हा उपनिबंधक यांनी तो स्वीकृत केला. लासलगाव बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत आठ ते आणि व्यापारी दलाल यांना दोन मताचे हक्क असून मतदानाच्या दिवशी तो नाकारण्यात आला. या निर्णयाविरुद्ध पराभूत उमेदवार ज्ञानेश्वर गांगुर्डे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे.

नवीन पदाधिकारी निवडीच्या प्रक्रियेवर मुंबई उच्च न्यायालयाने आक्षेप घेत सभापती उपसभापती निवडीला अंतरीम स्थगिती दिली. एक महिन्यापासून नवीन पदाधिकारी निवड न झाल्याने बाजार समितीच्या कामकाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

भाजपचे शिवाजी चुंबळे गटातर्फे नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अविश्वास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. २०२३ मध्ये झालेल्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते माजी खासदार देविदास पिंगळे यांनी १८ पैकी १२ जागा जिंकून स्पष्ट बहुमत प्राप्त केले होते तर प्रतिस्पर्धी चुंबळे गटाला सहा जागावर समाधान मानावे लागले होते. सभापतीपदी पिंगळे स्वतः विराजमान झाल्यानंतर समर्थक संचालकांना सहा-सहा महिन्याचे उपसभापतीपद देऊन खुश करण्याचा प्रयत्न केला. मात्र पिंगळे यांच्या कारभाराविरोधात ९ संचालकांनी बंड करत चुंबळे यांना जाऊन मिळाले. चुंबळे गटाचे सहा असे पंधरा संचालक एकत्र आल्याने अविश्वास प्रस्ताव नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला. दगा फटका टाळण्यासाठी सर्व संचालक मुंबईमार्गे थेट विदेशात रवाना झाल्याची चर्चा आहे. दरम्यान११ मार्चला अविश्वास ठरावावर चर्चा होणार आहे. संचालक मंडळाच्या फोडाफाडी मागे मंत्री गिरीश महाजन यांचा हात असल्याचा आरोप पिंगळे यांनी केला आहे.

मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दीड वर्षापूर्वी झालेल्या संचालक मंडळाच्या १८ जागांपैकी माजी मंत्री छगन भुजबळ समर्थक १० जागांवर तर आमदार सुहास कांदे समर्थक ६ जागांवर विजय झाले होते. दोन जागा व्यापारी गटाला मिळाले होते. १२ संख्याबळ झाल्यामुळे भुजबळ समर्थकांनी सर्वप्रथम बाजार समितीची सत्ता काबीज केली होती. बाजार समिती संचालक माजी आमदार संजय पवार यांनी भुजबळ यांची साथ सोडली. त्यानंतर आणखी पाच सदस्य आमदार कांदे गटात सहभागी झाल्याने आमदार कांदे समर्थकांची संख्या १० झाली आहे.

# 'सह्याद्री' निवडणुकीसाठी १५७ उमेदवारी अर्ज दाखल

**कराड :** कराड येथील सह्याद्री सहकारी साखर कारखाना संचालक मंडळ निवडणुकीसाठी बुधवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी एकूण विक्रमी १५७ उमेदवारी अर्ज दाखल झाले. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाअखेर २३४ उमेदवारांचे एकूण २५१ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

यावेळी कारखाना निवडणुकीसाठी विक्रमी उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक अटीतटीची होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आता दाखल अर्जाची छाननी आज गुरुवारी होणार आहे. गटातील नामनिर्देशन पत्रांची छाननी संपल्यानंतर महिला राखीव, अज/अजा, इमाव व विजा/भज/ वि.मा.व या राखीव मतदारसंघातील दाखल नामनिर्देशन पत्रांची एका मागून एक छाननी करण्यात येईल.

जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रिक, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकारी संस्थाचे सहाय्यक निबंधक राहूल देशमुख, संजय जाधव, उपनिबंधक अपर्णा यादव काम पाहत आहेत.

# एका जन्माची अनमोल कहाणी

**लेखकः आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**



ती जन्माला आली, तेव्हा घर आनंदाने फुलून गेले. तिच्या छोट्या हातांना धरून आई-वडील तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी स्वप्नं पाहू लागले. ती त्यांच्या डोळ्यांचा तारा होती, त्यांच्या संसाराची गोड मिठाई. बापाच्या खांद्यावरून ती आकाशाला गवसणी घालायची, आईच्या कुशीत लपून स्वतःचा छोटा आनंद शोधायची. हळूहळू ती मोठी झाली. घरातील चिमणी आता नव्या घरट्याकडे जाणार होती. लग्नाची गोड स्वप्नं बघता बघता तिच्या मनात काहीसा गोंधळ होता. पाय तिच्या माहेरात रुजले होते, पण आता तिला नवीन घराच्या अंगणात उमलायचं होतं. सासरी गेली, नव्या जबाबदाऱ्यांमध्ये गुंतली. प्रेम मिळालं, पण त्यासोबत अपेक्षांचं ओझंही. स्वतःसाठी जगण्याचा हक्क कुठेतरी मागे पडला. काळ पुढे सरकला, आणि ती आई झाली. तिने एका नव्या जीवाला जन्म दिला. आता तिच्यासाठी तिचं अस्तित्व नव्हतंच, तिचं जगणं तिच्या मुलांसाठी झालं. रात्रभर मुलासाठी जागणं, स्वतःचं दुःख बाजूला ठेवून त्यांच्या आनंदासाठी हसणं-सगळं तिने हळूच स्वीकारलं. तिचं मन कधी कधी गहिवरायचं, पण ती कधी बोलली नाही. तिच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रूही ती लपवायची. आयुष्य पुढे सरकलं. मुलं मोठी झाली, संसारात रमली. तिचे हात मात्र आता थकत चालले होते. जे घर तिच्यासाठी होतं, ते आता मुलांसाठी झालं. तिच्या काळजीच्या जागी प्रश्नचिन्ह उभं राहिलं. तिने ज्या लेकरांना प्रेमाने वाढवलं, तेच आता आपल्या आयुष्यात गुंतले. तिला आधीसारखं वेळ देणं त्यांच्यासाठी अवघड झालं. ती काही म्हणाली नाही, फक्त हसत राहिली. कधी काळी जिच्या कुशीत सगळं घर हसत होतं, तीच आता कोपऱ्यात गप्प बसू लागली. तिचे डोळे दाराकडे लागले होते, कुणीतरी हाक मारेल या आशेने. परंतु दिवस जात राहिले, आणि ती आशा हळूहळू विरत गेली. स्त्री ही जन्मतःच प्रेमाचा सागर असते. ती देत राहते, स्वतःच्या अस्तित्वाची किंमत न करता. पण तिच्यासाठी कोण देतं? ती फक्त कोणाची तरी मुलगी, पत्नी किंवा आई म्हणूनच ओळखली जाते. तिला स्वतःसाठीही ओळख हवी असते. ती फुलते, झिजते, आणि शेवटी शांतपणे विसावते. एकाच जन्मात अनेक परीक्षा देते, अनेक भूमिका निभावते. पण या सगळ्या प्रवासात एकच प्रश्न राहतो-तिला खरंच कधी तिचं स्वतःचं आयुष्य मिळतं का?

# गावातील महिलांचे पाणी गुणवत्ता तपासणी प्रशिक्षण संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
**रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण**

गावातील महिलांचे पाणी गुणवत्ता तपासणी प्रशिक्षण संपन्न .ग्रामीण भागातील पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावातील पाच महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे गाव पातळीवर पाणी गुणवत्ता तपासणी करण्याकरिता कायमस्वरूपी यंत्रणा उभी करण्यास मदत होत असल्याचे मत पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी व्यक्त केले. अलिबाग तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायतीत पाणी गुणवत्ता तपासणी महिलांचे प्रशिक्षण शुभांगी नाखले यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. पाण्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवताना याबाबत नागरिकांत जनजागृती निर्माण करणे, पाणी व स्वच्छतेबाबत त्यांना सजग करण्याचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील पाणी



गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत गावस्तरावर आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांच्या मार्फत पाणी गुणवत्ता तपासणी करण्याचे काम केले जाणार आहे.पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील गावस्तरावर पाणी गुणवत्ता तपासणीसाठी पाच महिलांची निवड केली आहे. यामध्ये आशा सेविका व अंगणवाडी सेविका व बचत गटाच्या महिला कार्यकर्त्यांचा समावेश आहे. त्यांच्यामार्फत गावातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे फिल्ड टेस्ट किटव्दारे पाण्याची जैविक व रासायनिक तपासणी केली जाणार आहे व त्यापैकी एक सक्रीय महिलांची प्रशिक्षणासाठी निवड केली आहे. सदर महिलांना तालुकास्तरावर प्रशिक्षण दिले जात आहे. यावेळी पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड, पाणी गुणवत्ता सल्लागार अदिती मगर, संवाद सल्लागार नेहा थळे, पंचायत समितीच्या समूह समन्वयक रूपाली नाईक उपस्थित होते.

# दिव्य कुरआन - ईश्वरी वाणी

रमजान महिन्यात अवतीर्ण झालेला कुरआन हा साक्षात अल्लाहने निर्माण केलेला दैवी ग्रंथ आहे.अल्लाह शिवाय कुणीही ईश्वर नाही व उपास्यही नाही,तो सर्वज्ञ आहे,तो मोठा उदार, क्षमाशील,दयावान व कृपाशील आहे.तो सर्वशक्तिमान व शासक आहे,तो सर्जन कर्ता व पालनकर्ता आहे,त्याचे दासांवर अनंत उपकार आहेत अशा प्रकारची शिकवण कुरआन मध्ये दिली आहे. जीवनासाठी आवश्यक तत्वज्ञान प्रस्तुत करतांना या सृष्टीचा निर्माणकर्ता अल्लाहच्या सर्व गुणवैशिष्टयांचा उल्लेख कुरआन मध्ये केला गेला आहे.वारंवार वाचन,पठन केल्याने त्यातील अर्थ आपल्याला उमजत असतो.अल्लाहची महती वर्णन करतांना अल्लाहच्या विविध रुपांचा उल्लेख कुरआन मध्ये केला गेला आहे.अल्लाह हा असीम कृपावंत व दयावान आहे.मोबदल्याच्या दिवसाचा स्वामी आहे. पृथ्वी व आकाशाचा मालक आहे.पूर्व आणि पश्चिम,उत्तर व दक्षिण सर्व त्याचेच आहे. तोच आपल्या सर्वांचा पालनकर्ता आहे.तोच एकमेव परमदयालु, परम कृपाळू परमेश्वर आहे. तोच चिरंतनजीवी असून तमाम सृष्टीचा भार सांभाळणारा तोच एकमेव ईश्वर आहे. सकल सृष्टींचा स्वामी, प्रतिष्ठा बहाल करणारा व अपमानित करणारा,




सत्यवचनी व उपास्य तोच आहे. तो उपजिवीका देणारा,दया व कृपा करणारा, हानीपासून वाचवणारा,दासांवर सर्वाधिकार बाळगणारा खरा स्वामी तोच आहे. दाणे व बीज फोडून अंकुर काढणारा व निशापटल फाडून प्रातःकाल करणाराही तोच आहे.जीवन व मरण देणारा तोच आहे. त्याच्या शिवाय ईतर कोणीही ईश्वर नाही. आकाश व पृथ्वीतील सर्व दृश्य,अदृश्य वस्तू त्याच्याच अधिकार क्षेत्रात आहेत.सर्व मामले त्याच्याकडेच रुजू होतात.तो क्षमा करणारा ही आहे व कठोर शिक्षा देणाराही आहे.तो प्रकट व अप्रकट अशा सर्व गोष्टींचा ज्ञाता,महान व सर्व स्थितीत उच्च असा आहे. त्याच्या निर्णयावर कुणीही पुनर्दृष्टी करणारा नाही व त्याला हिशोब घेण्यास ही विलंब लागत नाही. सृष्टीतील सर्व गुप्त सत्यांचे ज्ञान त्यालाच आहे,तो सर्व काही करु शकतो.त्याचा कोणीही पुत्र नाही व त्याच्या बादशाहीत कुणीही भागीदार नाही,तोच सर्वांचा स्वामी आहे. अशा प्रकारे अल्लाहची महती कुरआन मधील विविध सुरए मधून वर्णन केलेली आहे.माणसाने कसे वागावे,त्याच्या प्रत्येक कृत्याची कल्पना अल्लाहला आहे.भले ते कृत्य उजेडात करो किंवा सात पडदे लावून अंधारात करो तो सर्वज्ञानी आहे म्हणून प्रत्येकाने अल्लाहची भिती बाळगून आपले जीवन सद मार्गाने जगावे,वाममार्गांचा त्याग करावा अशा प्रकारची शिकवण कुरआन मध्ये देण्यात आली आहे.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# पैठण तहसीलदार सारंग चव्हान यांच्यासह एक खाजगी ईसम लाच लुचपत विभागाच्या जाळ्यात,

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण तालुक्यातील हिरडपुरी येथुन अवैध्य वाळूची वाहतूक करतांना जप्त केलेले वाहन सोडून देण्यासाठी पैठणचे तहसीलदार सारंग भिकुसिंग चव्हाण यांचे तहसिल कार्यालयातील कामे पाहणारा खाजगी ईसम सलील करीम शेख व महसूल कर्मचारी हरिश शिंदे यांना सोमवार दि.३/३/२०२५ रोजी अहील्यानगर येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने एक लाख दहा हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडून त्याचा जबाब घेतल्यानंतर पैठणचे तहसीलदार सारंग चव्हाण यांना देखील पथकाने ताब्यात घेत त्यांची कसून चौकशी करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या विषयी अधिक माहिती अशी की,काही दिवसापूर्वी अतिरिक्त जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांच्या पथकाने हिरडपुरी येथे अचानक कारवाई करून अवैध वाळू वाहतूक करणारी चार ते पाच वाहने पकडून पैठण तहसील कार्यालयात जमा केले होते. या मधील एका वाहनाचा दंड भरूनही ते वाहन तहसिल कार्यालयाने लाचेच्या आशेने सोडले नव्हते.



सदरील वाहन सोडण्या साठी खाजगी ईसम सलील शेख यांच्याकडून तहसिलदार चव्हाण व स्वतः करीता २ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली.त्यानुसार तक्रारदाराने तहसिलदारांचा खाजगी ईसम सलील शेख यांच्याकडे आठ दिवसापूर्वी ९० हजार रुपये दीले. व उर्वरीत रक्कम १ लाख १० हजार रूपये नंतर देतो असे सांगितले.परंतु तक्रारदाराची लाच देण्याची मानसिकता नसल्याने त्यांनी सरळ आहील्यानगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याबाबत तक्रार केली त्यानुसार लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने सापळा रचून ठरल्या प्रमाने उर्वरीत लाचेची रक्कम तहसीलदाराचा सहकारी खाजगी ईसम सलील शेख हा हिरडपुरी येथे घेतांना लाच लुचपत विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. तसेच महसूल कर्मचारी हरिष शिंदे यांनी जप्त केलेल्या वाहनातील वाळू आपल्या घरी टाकण्याचे सांगत त्यांनी तक्रारदाराकडून वस्तु व तिस हजार रूपये रोख रक्कमेच्या स्वरूपात लाचेची मागणी केल्याची तक्रार केली असल्याने त्यांना सुद्धा या प्रकरणात सहआरोपी करत तहसिलदार चव्हाण यांच्यासह खाजगी इसम सलील शेख यांच्या विरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.